# माझी कोविड कथा

मनोरमा गोखले वय ९२ वर्षे

कोविडच्या विषाणूने नोव्हेंबर-डिसेंबर २०१९ पासून जगभरात आपले हातपाय पसरवायला सुरुवात केली. भारतामध्ये मार्च २०२०च्या पहिल्या आठवड्यापासून कोविडचे परिणाम हळूहळू जाणवायला लागले. २२ मार्च रोजी जनता कर्फ्यू लागला. त्या दिवशी जनमानसाने उत्स्फूर्तपणे कोविड योध्यांना मानवंदना दिली. २४ मार्च पासून लॉकडाऊन सुरू झाला.

हळूहळू कोविडची भीषणता जाणवू लागली. काही चिरपरिचितांना त्याची लागण झाली तर काही परिचितांचा मृत्यूही झाला. सर्वत्र ताणतणावाचे वातावरण होते, कोणीही कोणाकडे जात-येत नव्हते. केवळ दूरध्वनीवरूनच संपर्क होत होता. प्रत्यक्ष भेटीगाठी होत नव्हत्या. त्यामुळे मनामध्ये सतत कोविडसंबंधीचेच विचार येत असत. अशातच एके दिवशी माझ्यासमोर साक्षात डॉ. कृष्णन् (भगवान श्रीकृष्ण) व नारदमुनी उभे राहिले. मी एक ज्येष्ठ नागरिका, अल्पमतिका आणि मनात सतत प्रश्नांची मालिका असणारी. उपरवाल्या डॉ. कृष्णन्‌ला विचारले, ''कोविड म्हणजे काय असतो हो प्रभू?'' ते उत्तरले, ''तुला तो अनुभवायचा आहे का?'' मी हसतहसतच ठामपणे हो असे म्हटले.

रविवार ११ ऑक्टोबरला सर्वप्रथम माझ्या तोंडाची चव गेली. कदाचित पोट बिघडल्यामुळे चव गेली असावी असा माझा तर्क, जेवण कमी जायला लागले, थकवा जाणवायला लागला. घरात ऑक्सिमीटर असल्यामुळे ऑक्सिजन लेव्हल रोज तपासली जात होती. हळूहळू ऑक्सिजन लेव्हल कमी होऊ लागली, त्यातच मला थोडा ताप आला. मंगळवारी डॉक्टरी सल्ल्यानुसार माझी कोविड टेस्ट करण्यात आली. त्याचा रिपोर्ट दुसऱ्या किंवा तिसऱ्या दिवशी येणार होता. त्याच रात्री माझी ऑक्सिजन लेव्हल ८३ पर्यंत खाली आली. घरच्यांची खूप घालमेल होत होती. बुधवारी मात्र मला घरच्यांनी हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करायचे ठरवले. कॉम्प्युटरमध्ये जरी हॉस्पिटलमध्ये जागा असल्याचे दाखवत असले, तरी प्रत्यक्षात मात्र बेड रिकामा नसल्याचे सांगितले जात होते. आणि कोविड टेस्टचा रिपोर्ट हातात येईपर्यंत कोविड हॉस्पिटलमध्ये दाखल करता येत नव्हते. कोविडची लक्षणे माझ्यात दिसत असल्यामुळे नॉन कोविड हॉस्पिटलमध्ये मला प्रवेश मिळत नव्हता. अशा परिस्थितीत घरच्यांची काळजी अजूनच वाढत होती. सरतेशेवटी फोर्टीस हॉस्पिटल, मुलुंड येथे मुश्किलीने प्रवेश मिळाला.

डॉ. कृष्णन् यांचे बोट धरूनच मी हॉस्पिटलमध्ये प्रवेश केला. इतक्यात 'नारायण नारायण' अशा गजरात वीणा किणकिणली. डॉ. कृष्णन्, मुनिवर्य आणि मी रुग्णालयात दाखल झालो.

रुग्णालय खूपच प्रशस्त होते. सुरुवातीला मला एका ए.सी. खोलीत नेले तिथे खूप डस्टबीन्स होती. मला वाटलं डस्टबीन्सचे गोडाऊन असेल. मग कळलं प्रत्येक पेशंटच्या खोलीत मेडिकल वेस्टची सात-आठ डस्टबीन्स असतातच. बापरे ! किती पेशंट? किती मेडिकल वेस्ट? किती प्रदूषण? असो.

नंतर मला रुग्णालयाच्या एका भल्या मोठ्या घराइतक्या प्रचंड मोठ्या हॉलमध्ये (ICU) नेण्यात आले. त्या हॉलमध्ये L टाईपमध्ये सगळ्या बेडस्‌ची रचना करण्यात आली होती. त्यातील एका कोपऱ्यातील मधल्या बेडवर

माझे प्रस्थान... शिवाय दोन बेडच्या मध्ये काचेचे पूर्ण पार्टिशन असल्यामुळे दोन्ही बाजूने प्रत्येक बेड दिसत असे. वरचे सिलींग खूपच ऊंच  व पारदर्शक होते. हॉलच्या मधल्या जागेत मोठ्या प्रमाणावर ठेवलेल्या फाईल्स, नर्सेस, आया यांची गंभीर हालचाल सतत चालू होती. प्रत्येक भिंतीवर छान छान चित्रं चितारली होती. एका चित्रात माकड झाडाला लोंबकाळून झोके घेत होतं, दुसऱ्या चित्रात 'झाडे तोडू नको' असे एक फळ माणसाला विनवीत होतं, आणखी एका चित्रात एका झोपाळ्यावर एक चिटुकलं झोका घेत होतं. अशी कितीतरी प्रसन्न चित्र दिसत होती.

आता रुग्णालयाचा पोषाख... नाकात ऑक्सिजनची नळी, एका हातावर बँडेजेस् पट्ट्या, दुसऱ्या हातावर इंजेक्शनस् देण्यासाठी केलेली कायमस्वरूपी व्यवस्था, सलाईन अशा विविध विभूषणांनी मला 'कोविड रुग्ण' म्हणून जाहीर केले. नंतर छातीवर विविध गोल चकत्या लावल्या. जमीन खणताना वापरतात तसले एक भव्य यंत्र प्रत्येक बेड जवळ येत होतं, फिरता फिरता ते माझ्यापर्यंत येणार होतं.

'मुनिवर्य' मी हाक मारली. ''हे जमीन खणण्याचं यंत्र इथे कशाला?'' मी विचारलं. ''याला एक्स रे मशीन म्हणतात. जमीन नाही तर तुझी छाती खणून तुझ्या रोगाचा शोध घेणार आहे. हा बकासूर आहे. खूप पैसे खाल्याशिवाय याची भूक भागत नाही, या बकासुराला तुला रोजच सामोरे जावे लागणार आहे'' मुनिवर्य म्हणाले. बाप रे!! आलीया भोगासी असावे सादर असे मी ठरवले.

विष्णुलोकात नवरात्रोत्सव चालू होता. सर्व देवता हळदीकुंकू समारंभासाठी एकत्र जमल्या होत्या, त्यामुळे डॉ. कृष्णन् रिलॅक्स मूडमध्ये भिंतीवरच्या झोपाळ्यावर झोका घेत शांतपणे बसले होते. इतक्यात डॉ. कृष्णन् आणि मुनिवर्य यांची नेत्रपल्लवी झाली. दोघांच्या चेहऱ्यावर स्मित झळकले.

मुनिवर्य मला म्हणाले ''वर बघ, वर 'भयसभा' आहे, ती तुला अनुभवायची आहे'' मी वर पाहिले वरच्या ऊंच पारदर्शक छतावर MI (Mumbai Indians)ची टीम जसे कपडे घालते तसे कपडे घालून कोविड टीम मैदानात उतरली होती. हातात नो बॉल, नो बॅट, डोक्यापासून पायापर्यंत संरक्षक कवच, हातात ऑक्सिजन सिलेंडर आणि शॅंपेनच्या ऐवजी सॅनिटायझर्सच्या बाटल्या. ते सर्वजण जोषात पीच लढवत होते. इतक्यात काहीजणांची शोधाशोध सुरू झाली. छताच्या अगदी शेवटच्या टोकाच्या ड्रॉवरमध्ये कोविड मृत्यूनंतर घालण्यासाठी संबंधित माणसाच्या अंगावर शरीराचा एकही कण दिसणार नाही असे कपडे ठेवलेले होते. त्यातूनच काही कपडे बाहेर काढत होते. काही लांब तर काही आखूड (जसे अंघोळीच्या बंबात पाणी तापविण्यासाठी लहान मोठे सरपण घालतात तसे) त्यापैकी एक ड्रेस मला फिट्ट बसणारा वाटला. आता हा माझ्या अंगावर चढणार आणि बंबातल्या सरपणाप्रमाणे मी एका क्षणात जळून जाणार व प्रदूषण पसरवणार.

माझी बोबडी वळली, अंगात कापरं भरलं, छाती धडधडू लागली. ''मुनिवर्य, मुनिवर्य'' मी किंचाळले. मुनिवर्य म्हणाले, ''कोवीड पहायचा आहे ना तुला? मग पहा आणि अनुभव सुद्धा. आम्ही दोघे आता वैकुंठासी जातो'' असे म्हणून दोघेही एका क्षणात अदृष्य झाले.

आता मला कोविडला एकटीनेच सामोरे जावे लागणार आहे, पण एक अनुभव मिळाला. ''आपुले मरण पाहिले म्या डोळा'' असो.

त्या कठीण प्रसंगातून मी मनाने जात असताना तुमचे नाना आजोबा म्हणजे माझा भाऊ याची मला आठवण झाली. त्याच्या सरत्या काळात मरण प्रसंगी जे धैर्य लागते ते त्याने माझ्या हातावर हात ठेवून मला दिले होते. ते एकदम माझ्या कामी आलं. त्या धैर्यानेच मला सावरले आणि भयसभा संपली.

हॉलमध्ये काही रुग्णांच्या खोकल्याचा आवाज येत होता. काही ठिकाणचे रुग्ण भराभरा बदलत होते. कोणाच्या नाकात ऑक्सिजनच्या नळ्या, काहींना तर व्हेंटिलेटर शिवाय एकही क्षण जगता येणार नव्हते, कुणी मदतनिसाच्या हातात ऑक्सिजन सिलींडर आणि त्याचा हात हातात पकडून हॉलमध्ये दोन-तीन फेऱ्या मारत होते. जरा बरे रुग्ण घरच्यासारखेच स्वतंत्रपणे फिरत होते. तिथे घरच्या कपड्यात फिरणारा २५ ते ३० वर्षे वयाचा एक रुग्ण मुलगा इकडे तिकडे फिरत होता. फिरता फिरता माझ्या बेडपाशी आला. तो रुग्णालयातील डॉक्टर होता. लोकांची सेवा करता करता स्वत:च रुग्ण झाला होता. छान होता. त्या कोविड योध्याला प्रणाम केला आणि तो निघून गेला.

दुपारच्या सुमारास फाईल घेतलेल्या नर्सेस बरोबर डॉक्टरांची टीम येत असे. रुग्णांपासून लांब उभे राहूनच ''कसं आहे'' असं विचारीत. मला खोकला, ताप, अंगदुखी असं काहीच होत नव्हतं, त्यामुळे मी फक्त 'OK' इतकंच बोलत असे. आपल्या आजारासंबंधी काही जाणून घेण्याची उत्सुकता असली आणि त्या नजरेने त्यांच्याकडे पाहिले तरी त्यांचे झाकलेल्या ड्रेसमधून थोडेसे दिसणारे चेहेरे कोरेच असत, त्यामुळे शांतच रहावे लागे. तिथला स्टाफ यंत्रवत काम करीत होता. वेळच्यावेळी सलाईन, बी. पी. तपासणी ऑक्सिजन लेव्हल तर बरेच वेळा चेक केली जायची. सगळं मुक्या तोंडाने आणि नर्सेस बोलल्या तरी मला हिन्दी येत नसल्यामुळे मला काहीच कळत नसे. एक नर्स मद्रासी होती, मी तिच्याशी बॉम्बे इंग्लिश मध्ये धाड धाड बोलले तर तिच्या कपाळवर आठ्याच चढल्या. मला 'मावशी' आणि 'मामा' यातील फरक त्यांच्या पोषाखामुळे अजिबात कळत नसे. एकदा 'मावशी' म्हणून ज्या व्यक्तिशी मी बोलले तर तो म्हणाला, ''आजी मी मावशी नाही मामा आहे.''

*''सर्वा घटी राम देहा देही एक*
*सूर्य प्रकाशक सहस्र रश्मी''*

हरिपाठाची आठवण झाली. आषाढीवारीत जसा लिंग भेद नसतो तसंच जाणवलं. वारकरी आणि पांडुरंग इतकंच लक्ष्य. त्याचप्रमाणे रुग्ण आणि सेवक इतकंच नातं आणि हे नातं मनाला भावलं.

एक मावशी म्हणाली ''आजी तुम्ही कायम कुशीवरच झोपा कारण माझी आई नेहमी कुशीवर झोपत असे.'' मी हसले. स्पायडर मॅन नेहमी हवेत झोपतो म्हणून मी पण हवेतच झोपू का? असे तिला मनातल्या मनात विचारले.

एक मामा, ''आजी कुठे राहता?''

मी सांगितले, 'ठाणा'

''ठाण्यात कुठे?'' त्याने विचारले.

मी सांगितले, 'घंटाळीत.'

असे बोलणे झाल्यापासून मी त्याला 'ठाणावाला' म्हणू लागले. तो पण एक बोट दाखवून घंटाळी घंटाळी, बेडेकर शाळा बेडेकर शाळा असे म्हणून मला दाद द्यायचा. बरेचवेळा येऊन जायचा आणि ''शंभर वर्षे जग, शंभर वर्षे जग'' असे मला म्हणे. शिवाय शंभरीच्या कार्यक्रमाला ''मी नक्की येणार'' असे म्हणत असे. त्याने एक महत्त्वाचा मंत्र दिला. ''काहीही झालं तरी हिंमत हरायची नाही'' हा तो मंत्र. आपल्या आयुष्याच्या छायेत अशी काही माणसं क्षणभर विसावतात आणि आपले आयुष्य संपन्न करतात.

एक फिजिओथेरपिस्ट रोज यायची. फक्त डोळे दिसायचे बाकी सर्व भाग पांढऱ्या कपड्यात असे. स्वच्छ मराठी बोलायची, मी पण माझ्या बारीक सारीक कुरबुरी तिला सांगायची. पहिल्यांदा ती मला 'काकू' म्हणत असे मग 'आजी' म्हणू लागली. तिने मला तिच्या मोबाईलमध्ये क्लिक केले आणि कितीतरी जणांच्या मोबाईल मधली जागा मी व्यापली... गम्मत वाटली.

दररोज सकाळी उठल्यावर आपण घरी चहा पितो पण इथे तर उलटंच होतं, दररोज सकाळी उठल्यावर एक इंजेक्शनची नळी माझ्या शरीरातून भरपूर रक्त काढून घेत असे. म्हटलं बरं झालं, थोडी चरबी कमी होईल. पण मग अतीच वाटू लागलं पण काय करणार? असो.

एक नर्स दररोज माझ्या नखालगतच्या बोटांवर आणि पोटावर 'टुचू टुचू' सुया टोचायची. मला तर वाटायचं की आता हार्मोनियम मधून जसे सूर उमटतात तसे माझ्या बोटा आणि पोटातून सूर निघणार की काय? गम्मत वाटली.

माझ्या नाकातल्या ऑक्सिजनच्या नळ्या वारंवार नाकातून निघून येत असत. कधी कोणी लक्ष देत असत तर कधी दुर्लक्ष. पण त्यामुळे त्या कशा ॲडजस्ट करायच्या? टायसारखी गाठ घेऊन घट्ट कशा करायच्या? हे माझे मीच शिकले.

हळूहळू माझी ट्रिटमेंट जराशी संथावली, सलाईन डोस कमी झाले, छातीवरच्या चकत्या निघाल्या वगैरे वगैरे... वार्षिक परीक्षेत पहिला नंबर आलेल्या आमच्या निरागस शेंडेफळाला वाटायचं की नक्की काय झालं? मी पास की नापास? तसाच प्रश्न माझ्यापुढे पडला, नक्की काय? मी बरी होत्येय की...

एखाद्या रानवाटा धुंढाळण्याची आवड असलेल्या पथिकाला जशी रानभूल पडते तसं झालं. तो पथिक रानात वाट चुकतो, काळोख होतो, वाटेतल्या जळवा, गोचिडी, काटे, विषारी वेली त्याला वेढतात; पण जेव्हा तो रानातून बाहेर पडतो तेव्हा त्याला हे सगळं निस्तरावं लागतं, या सगळ्यातून सुटका करून घ्यावी लागते. अगदी तसंच झालं. माझ्या शरीरातील शीरच वाट चुकली, नर्सताई हातावर चापट्या मारीत होती हात दाबत होती, मी मूठ शक्य तितकी घट्ट आवळून धरली होती, पण शीर काही सापडेना ''कुठे आहे?'' नर्सने मला नजरेनेच विचारले. मी मनातल्या मनात तिला उत्तर दिले, ''अेऽ अेऽऽ अेऽऽऽ मला नाही हं माहीत, मी हात सुद्धा लावला नाही तूच ती कुठं गेली ते शोध'' शेवटी एकदाची नर्सीला शीर सापडली.

गर्वाच्या झाडावर चढणाऱ्या आजीची गोष्ट सांगण्या आधी मी एक गोष्ट सांगते. साधारण १९४२-४३चा काळ, मुंबई जवळ असली तरी बऱ्याच जणांनी ती पाहिली नव्हती. एवढा खर्च करणं परवडणारच नव्हतं. त्या वेळी आम्हाला एक धडा होता, धड्याचे नाव होते 'अज्ञानात आनंद' एका गृहस्थाला येता-जाता लोक 'हिप्पॉपोटेमस'

म्हणत असत. त्याने तो प्राणी कधीच पाहिला नसल्या मुळे तो अगदी खूश होऊन जाई, पण जेव्हा केव्हा राणीच्या बागेतील हिप्पॉपोटेमस त्याने पाहिला तेव्हा त्याचा अज्ञानातला आनंद हरवला.

कोविड मुळे माझ्या चेहऱ्यात काय फरक पडला आहे हे मला माहीत नव्हते. पण आजूबाजूचा जमवलेला गोतावळा मला त्याची जाणीव करून देत असे. कुणी येता-जाता गालावर चापट्या, गालगुच्चे, तर कुणी कुणी विचारीत, ''आजी तू कुठलं क्रीम वपरतेस?'' माझी सहप्रवासी ताई म्हणाली, ''या वयात इतक्या छान दिसता तर तरुणपणी अधिकच छान दिसत असाल.'' झालं आजी गर्वाच्या झाडावर चढत चालली. मनात सुखसंवेदना. एखाद्या ब्यूटी काँटेस्ट मध्ये भाग घेण्याचा विचार सुद्धा मनात येऊन गेला. पण जेव्हा घंटाळीत परतले तेव्हा तिथल्या दर्पणाने मला माझे खरे रूप दाखविले आणि माझा 'अज्ञानातील आनंद' हरवला. आजी गर्वाच्या झाडावरून खाली उतरली.

अशा गोष्टी घडता घडता साधारण ६-७ दिवसांनंतर (नक्की आठवत नाही) मला ICU मधून सहाव्या मजल्यावरील वॉर्डमध्ये हलविले. आधीचा परिचित मामा म्हणजे महत्त्वाचा मंत्र देणारा मामा, सहाव्या मजल्या पर्यंत मला सोडायला आला.

एके दिवशी सकाळी ८-३०च्या सुमारास एक सहप्रवासी माझ्या रूम मध्ये आली. ठाण्याच्या चरई विभागात राहणारी, खूप बोलकी होती. बदलापूरच्या म्युनिसिपालटीत नोकरी, कोविडसाठी लागारे सर्व साहित्य पुरविण्याचे काम... ऑफिसमध्ये पैसे खात नसल्यामुळे येणाऱ्या अडचणी... सगळं भरभरून बोलत होती. अध्यात्माच्या पाच परीक्षा दिलेल्या. तिने प्रश्न विचारला,''श्री लक्ष्मी विष्णुसंनिध कुठे बसली आहे?'' ''विष्णुच्या पायाशी'' माझ्या भोवती असलेल्या मावशांनी उत्तर दिले. सर्वांनी माना डोलावल्या. माझ्या मनात आलं की, या पुरोगामी जगात तिने कुठे बसायचे हे ठरवण्याचा अधिकार फक्त तिलाच आहे, असे स्त्री हक्क बाळगणारी आधुनिक स्त्री म्हणाली असती. माझ्या त्या सहप्रवासिनीने सहयोग मंदिरात असलेल्या लावणी स्पर्धेत भाग घेऊन पहिला नंबर मिळवला. ती लावणी तिने मोबाईलवरून मला ऐकवली, मला ऐकण्याची तक्रार असल्याने काहीच ऐकू आले नाही, पण मी तिची स्तुती केली. एकदा तर शरद पोंक्षेंचं नाव आम्हा दोघींनाही आठवलं नाही. आमची छान गट्टी जमली होती, पण ए.सी. लावण्यावरून माझ्या खास मावशीचं आणि तिचं बिनसलं. दोघी रागात होत्या, मी मात्र दोघींना निरनिराळं गाठून 'तुझंच बरोबर' असं सांगितलं. दोन-तीन दिवस आम्ही एकत्र होतो. ती स्वतः, तिचा मुलगा आणि तिचे मिस्टर सगळे या हॉस्पिटलमध्येच ॲडमिट होते. नंतर ती तिच्या मिस्टरांच्या रूम मध्ये गेली.

तिन्हीसांजेची वेळ, खास मावशी निघून गेलेली, दुसरी मावशी ड्यूटी संपवून अंघोळ, जेवण करून येणार. तोपर्यंत मी एकटीच, शिवाय कोणाच्या मदतीशिवाय मी काहीच करू शकत नव्हते. माझा प्रॉब्लेम मी सिस्टरला सांगितला. मग, ''आजीको डर लगता है'' असे हसत हसत म्हणत तिने मला दुसऱ्या रूममध्ये हलवले.

एके दिवशी कळलं आज रविवार आहे, दसरा आणि २५ तारीख, आधीचं काही माहित नव्हतं आणि आवश्यकताही वाटली नाही, अजून तीन दिवस तरी इथे रहायची मनाची तयारी केली होती. सकाळी साधारण आठ वाजण्याची वेळ असावी. नारळी पौर्णिमेला कळव्याच्या जत्रेत एक आण्याला घेतलेला घड्याळाचा पट्टा हळूच माझ्या मनगटावर स्थिरावला.

''हॅलो, हॅलो. कोविड १०२५, मनोमम्मा, मी पट्टा बोलतोय!'' ''बोल बोल बाबा ८० वर्षांनी हाती आलायस'' इति मी. ''तुला एक गंमत सांगू? तू आज घरी जाणार आहेस. '' ''नको रे आशा लावूस'' असं मी म्हणताच ''बघच तू'' असं तो म्हणाला आणि फोन ऑफ झाला.

आता थोडं आध्यात्म... मृत्यू लोकात चोवीस तासाचा दिवस असतो पण गंधर्व लोक, इंद्र लोक, ब्रह्म लोक, विष्णु लोक असे वर वरचे लोक आहेत, तिथे गती मंदावते. शेवटच्या लोकात तर एक दिवस पुरा होण्यासाठी मृत्यू लोकातील एक लक्ष दिवसांचा काळ जावा लागतो. म्हणजे काळाची गती खूपच मंदावते. मी मृत्यूलोकात असूनही माझी गती खूपच मंदावली. कासव गती, मुंगी गती यांच्यापेक्षा काळ कितीतरी हळूहळू सरकत होता.

सुमारे बारा वजले, डॉक्टरांची मांदियाळी आली. ''आजी, आज तुम्हाला घरी सोडतोय.'' डॉक्टर म्हणाले. त्यांचे खूप खूप आभार मानले. सर्व टीमला यशाचे क्रेडीट दिले. माझ्यासाठी ठेवलेल्या स्पेशल मावशीने डॉक्टर गेल्यावर, दोन पेशंट मधला पडदा दूर सारून दोन्ही हातांचे अंगठे आम्हा दोघींना दाखवून चक्क भांगडा नृत्य केलं. तो क्षण मनात जपून ठेवला. आज मी आणि माझ्या शेजारची सहप्रवासी दोघी घरी जाणार, आनंद आहे.

माझ्या बेडला कठडे होते. त्यामुळे दुसऱ्यांवर अवलंबून रहावे लागत होते. लांबच्या भिंतीशी आणून ठेवलेले जेवण बेड पर्यंत आणणे, हातावर पाणी, बाथरूम पर्यंत जाणे काहीच जमत नव्हते आणि नेमकी स्पेशल मावशी अदृष्य होत होती. सारखी टंगळ मंगळ पण शांत राहण्या व्यतिरिक्त पर्याय नव्हता.

इतक्यात एक सिस्टर आली. तिने माझ्या शरीरात कायमस्वरूपी लावलेल्या सुया, बॅन्डेजेस, चिकटपट्ट्या, घड्याळा सारखा मनगटातील पट्टा सर्व सर्व काढून मला 'कोविड मुक्त' असे जाहीर केले. दुसरी नर्स पोतंभर औषधे कधी व कशी घ्यायची ते समजावून गेली. अर्थात मी नुसतंच 'हो हो' म्हटलं. मुंग्यांच्या रांगेत मुंग्या जशा एकमेकींना भेटून पुढे जातात तसे माझा मुलगा आणि नातू रुग्णालयाच्या प्रत्येक डिपार्टमेंट मध्ये जाऊन पोतंभर पैसे देऊन आणि खंडीभर औषधे खरेदी करून माझ्यासाठी गाडी घेऊन स्वागतास हजर होते.

माझा घरच्या दिशेने म्हणजे 'घंटाळी सहनिवास'च्या दिशेने प्रवास सुरू झाला. एक एक गेट पार करत ट्रॅफिकमध्ये अडकत अडकत गाडी जात होती. तासाभराने 'ऐरोली'ची पाटी दिसली. इतक्यात फोन वाजला. औषधे हॉस्पिटलमध्येच राहिली होती. कॉम्प्युटरच्या काळात माणसं विसरतातच कशी? आश्चर्य वाटले. आता 'पुनरपी रुग्णालयम्', एवढ्या वेळात दीड तास गेला. पुढे स्पेशल मावशांनी त्यांना भेटण्यासठी दोन तास घुमवले. नातू एकीकडे माझ्याशी बोलत होता पण ज्येष्ठ मामाच्या काळजीने खूपच अस्वस्थ होता. साहजिकच होतं. त्याची खूपच धावपळ चालू होती. थकला होता तो.

सहनिवासातील वॉचमनपासून सर्वांच्या शुभेच्छा स्वीकारत दाराशी आले. माझ्या सुनेने फुलं, रांगोळ्या, वेलकम पाट्या लावून अगदी मनापासून आणि प्रेमाने स्वागत केले. गोरज मुहूर्तावर दिवस गोड झाला.

माझ्या परिवारातील सर्वांनी अतिशय कष्ट घेतले अतीव पैसा खर्च केला आणि अपरंपार प्रेम दिलं. माझे सर्व नातेवईक, सुहृद या सर्वांमुळे मला परमेश्वरी वरदहस्त मिळाला. तब्येत छान सुधारत आहे. त्यामुळे लिहिण्यास उत्साह वाटत आहे.

नातवंडांचा आग्रह- माझा एकटेपणा घालवण्यासाठी आणि मनाने यातून बाहेर पडण्यासाठी हा लिखाणाचा प्रपंच.

आपल्यावर उपचार करणाऱ्यांना संपूर्ण साथ देणे, मनाचा समतोल ढळू न देणे आणि जे दान पडेल ते आनंदाने स्वीकारणे या तीन गोष्टी केल्या की अडचणींतून आपण नक्की बाहेर पडतो. हे मी या पंधरा दिवसांत शिकले.

इति श्री कोविड पुराणम् संपूर्णम्

**–मनोरमा गोखले**


मनोरमा गोखले
C/O श्याम गोखले
४, सुमेधा, घंटाळी सहनिवास,
नौपाडा, ठाणे ४०० ६०२

email : shyamgokhale@yahoo.co.in

Mob : 9321271520